मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४००४ /०२

श्रीमती गुलाब सौमालिया --अपिलार्थी
संचालक, सिताराम इंडस्ट्रीज लिमिटैड,
धुन अपार्टमेंट, ९ वा मजला ६६,
वरळी, हील रोड,मुंबई ४०० ०१८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,(इस्टेट) ---उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्केट इमाररत,
२ रा मजला, पलटण रोड, गुलाब ४०० ०००१

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी (lease)
बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्केट इमाररत,
२ रा मजला, पलटण रोड, गुलाब ४०० ०००१

-विवेचन-

श्रीमती गुलाब सौथालिया, संचालिका, सिताराम इंडस्ट्रीज यांनी आयोगाकडे दि.३.४.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले होते. त्या अपीलाची सुनावणी दिनांक १६.३.२००९ रोजी घेण्यांत आली.

दि.१२.११.२००७ च्या अर्जाने अर्जदाराने सिताराम इंडस्ट्रीज व अंगद एंटरप्रायझेस यांच्यामध्ये झालेल्या व्यवहाराच्या रक्कमेवर डिड ऑफ असाईनमेंटमध्ये दर्शविलेल्या रक्कमेऐवजी इंडेक्स-२ मध्ये दर्शविलेल्या रक्कमेवर ७ टक्के दराप्रमाणे प्रिमियम वसुल केलेले आहे त्याची माहिती मागितली. त्याबाबतची माहिती दि.७.१२.२००७ च्या पत्राने देण्यांत आलेली आहे. तसेच दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने दि.४.१.२००८ रोजी प्रथम अपील सादर केले होते. तसेच दि.२८.२.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये इंडेक्स-२ मध्ये त्यावर नमूद केलेली रक्कम ही डीड ऑफ असाईनमेंटमध्ये असलेला रकमेपेक्षा जास्त असल्याने त्या रक्कमेवर ७ टक्के दराने प्रिमियम आकारले गेलेले आहेत हेही स्पष्ट केलेले आहे.

सुनावणीच्या वेळी असे दिसून आले की, अर्जदाराचे अपील हे माहितीसाठी नसून डिड ऑफ असाईनमेंट ऐवजी इंडेक्स-२मध्ये दर्शविलेल्या रक्कमेवर ७ टक्के दराने व्याज आकारण्याबाबतचे आहे. माहितीच्या अधिकारामध्ये जसे कागदपत्र उपलब्ध असतील तशा कागदपत्राच्या प्रती देण्याबाबत तरतूद आहे. जर अर्जदारांना ज्या पध्दतीने प्रिमियम आकारण्यांत आलेला आहे तो मान्य नसेल तर त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे त्याची दाद मागणे उचित राहिल. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

आ दे श

माहिती दिली असल्याने अपील अमान्य करण्यांत येत आहे. प्रथम अपीलीय अधिका-यांनी यापूढे मुदतीत अपीलाचा निर्णय द्यावा.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६ मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४००९ /०२**

**श्री.राहुल अढांगळे --अपिलार्थी**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स.गृहनिर्माण संस्था,**
**सिध्दार्थ कॉल्नी, चेंबूर, मुंबई ४०० ०७१**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अभियांत्रिकी कक्ष ---उत्तरवादी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी-९**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१**

**-विवेचन-**

**श्री.राहूल अढांगळे यांनी आयोगाकडे दिनांक १२.१.२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.१६.३.२००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदारास "आदिशक्ती डेव्हलपर्सने ३४८२ सदस्यांचा प्रस्ताव सादर करताना कमीत कमी ७० टक्के म्हणजे २५०० सदस्यांची संमत्त्ी पत्रे देणे कायदयाने बंधनकारक आहे. अशा स्थितीत ३४८२ सदस्य संख्येत१८०० संमत्तीपत्रे म्हणजे ५१ टक्के होतात जे ७० टक्के पेक्षा कमी आहेत. याचाच अर्थ दि.२३ ऑगस्ट २००६ रोजी आदिशक्ती डेव्हलपर्स ने उघडउघड ७०टक्के संमत्ती नसताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रस्ताव सादर केला व अभियंता विभागाने त्याची स्कुटीनी फी भरुन घेऊन अवैधरित्या सादर करुन घेतला.**

**हे बेकायदेशीर कृत्य लपविण्यासाठी झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाने सहाय्यक अभियंता हे संमत्तीपत्रे दिलेल्या सदस्यंची संख्या जाणूनबुजून लिखीत न देता विविध कागदपत्रांच्या १४७१४ झेरॉक्स प्रती दिल्याचे लिखीत कळवितात. हे कृत्य विकासक आदिशक्ती डेव्हलपर्सला अनधिकृतरित्या सहकार्य करण्यासाठी केले जात आहे हे सिध्द होते. याकरिता ३४८३ सदस्यांच्या दि.२३ ऑगस्ट २००६ रोजी सादर झालेल्या प्रस्तावातील**

सहाय्यक अभियंता यांनी दिलेल्या १४७१४ झेरॉक्स प्रतिमध्ये किती सदस्यांची समंतीपत्रे सादर झाली होती याची लिखीत माहिती जी आजवर लपविण्यांत येत आहे ती स्पष्टपणे लिखीत स्वरुपात द्यावी " अशी माहिती पाहिजे होती.

उपरोक्त माहिती अर्जदाराने जवळपास रुपये २९,००० भरुन प्राप्त करुन घेतली आहे. तरी त्यांना असे वाटते की, काही माहिती त्यांना देण्यांत आलेली नाही. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, वरील प्रस्तावाबाबतची झोपडपटटी पुर्नवसन योजना ही अजुनही मंजूर करण्यांत आलेली नाही व त्याप्रमाणे असलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रती अर्जदारास देण्यांत आलेल्या आहेत. संपूर्ण नस्तीची प्रत देण्यांत आलेली असल्या तरी काही कागदपत्राच्या प्रती दिलेल्या नाहीत असे अर्जदारानी ठामपणे सांगितले. अर्जदारास पुन्हा नस्ती दाखवून त्यांना एकदा खात्री करुन घ्यावी व काही प्रती पाहिजे असतील तर त्या देण्यांत याव्यात. असे निर्देश देण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आ दे श

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६ मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४००५ /०२**

**श्री. नरेंद्र भिकाजी सावंत --अपिलार्थी**
**इमारत क्र.५/१४८,**
**१४८, सहकार नगर-५ चेबूर ,मुंबई ४०० ०७१**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,(इस्टेट) ---उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पश्चिम विभाग,**
**शरदभाऊ, आचार्य मार्ग, चेंबूर मार्ग ४०० ००७१**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पश्चिम विभाग,**
**शरदभाऊ, आचार्य मार्ग, चेंबूर मार्ग ४०० ००७१**

**-विवेचन-**

**श्री. नरेद्र भिकाजी सावंत, यांनी दि.२६.१२.२००८रोजी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले होते त्याची सुनावणी दि.१६.३.२००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदाराने एका विषयावर दिनांक २२.८.२००८ व दि.२२.९.२००८ असे वेगवेगळे दोन अर्ज केले होते. दि.२२.८.२००८ रोजीच्या अर्जा संदर्भातील माहितीची प्रत अर्जदारास देण्यांत आलेली आहे. मात्र दि.२२.९.२००८ रोजीच्या अर्जासंदर्भातील माहितीबाबत काहीही कार्यवाही झालेली दिसत नाही त्या संदर्भातील माहिती ही अर्जदारास हवी आहे. अर्जदाराची ही तक्रार म्हाडाकडे पाठविले असल्याबद्दल जे पत्र आहे त्याची प्रत अर्जदारास हवी आहे जन माहिती अधिकारी यांनी मात्र पूर्वीच्या अर्जासारखाच अर्ज असल्याचे समजूत करुन घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे अर्जदारास ज्या पत्राची प्रत पाहिजे ती प्रत दोन दिवसाचे आत देण्यांत यावी. तसेच अर्जदारास माहिती देण्यास उशिर का झाला? या संदर्भात शास्ती का होऊ नये याबाबत खुलासा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास १० दिवसाचे आंत सादर करावा असे निर्देश दंण्यांत येत आहेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६ मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/ ४०१२ /०२

श्री. हरिराम धोंडूजी म्हाप्रोळकर --अपिलार्थी
३०१, सावित्री सदन, को.हॉ.सोसायटी.
सी.टी.एस.न.१५११ ते १५२१, वाकोला व्हिलेज,
सेंट ॲथॉनी रोड, सांताक्रुज (पूर्व)मुंबई ४०००५५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, ---उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग,
१३७,टी.पी.एस.व्ही.२ रा मजला, प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ (पूर्व)मुबई ४०००५५

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का)
बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग,
१३७,टी.पी.एस.व्ही.२ रा मजला, प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ (पूर्व)मुबई ४०००५५

**-विवेचन-**

श्री. हरिराम धोंडूजी म्हाप्रोळकर यांनी दि.३०.१२.२००८रोजी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले होते त्याची सुनावणी दि.१६.३.२००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला अपिलार्थीच्या अपिल मेमोवरुन असे दिसून आले की, अर्जदारास माहिती पेक्षा कृतीची अपेक्षा आहे. अर्जदाराच्या अर्जानुसार सीटीएस नं.१५११ ते १५२१ व्हिलेज कोले कल्याण, सांताक्रुझ (पूर्व) येथील इमारतीवरील मोबाईल बॉक्स, जनरेटर हे अनधिकृत असल्यामुळे ते काढून टाकण्यांत यावेत, अशी अर्जदाराची मागणी आहे व अर्जदारास सदरील बांधकाम हे दि.२०.११.२००८ उध्वस्त करण्यांत आले व सदरील मशिनरी निकामी करण्यांत आली असे उत्तर देण्यांत आले आहे. मात्र सदर कार्यवाहीने अर्जदाराचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी वरील अपिल आयोगाकडे केलेले आहे.

अर्जदाराच्या अर्जानुसार केलेल्या कृतीची माहिती अर्जदारास देण्यांत आलेली आहे. त्यामुळे जसे कागदपत्र उपलब्ध आहेत त्याप्रमाणे माहिती दिलेली आहे. मात्र अर्जदारास झालेली कृती पसंत नसेल तर त्याबाबत महापालिकेच्या प्रशासकिय विभागाकडे पाठपुरावा करणे योग्य राहील.

**आ दे श**

अपील अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६ मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४०२१ /०२**

**श्री. प्रणाली धयाळकर --अपिलार्थी**
**२३/३९, बी.डी.डी.चाळ,**
**एन.एम.जोशी मार्ग, मुंबई४०० ०१३**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता ---उत्तरवादी**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई(सा.बा.)मंडळ,**
**२५, मर्झमान रोड फोट, मुंबई ४०००१**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई(सा.बा.)मंडळ,**
**२५, मर्झमान रोड फोट, मुंबई ४०००१**

**-विवेचन-**

**श्री. प्रणाली धयाळकर यांनी दि.२९.१२.२००८रोजी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले होते त्याची सुनावणी दि.१६.३.२००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदारास दि.४.५.२००८ रोजी घेण्यांत आलेल्या वरिष्ठ लिपिक आणि संगणक पदाच्या पात्र उमेदवाराचे अंतिम निवड यादी मधील उमेदवाराची शैक्षणिक गुणवत्ता क्रमांक, आसन क्रमांक नोंदणी क्रमाक, प्रवर्ग इत्यादि माहिती पाहिजे होती.**

**प्रथम अपिलामध्ये ज्यांची माहिती विचारलेली आहे ती त्रयस्थ व्यक्तीची माहिती आहे ती देण्यास ज्यांनी होकार दर्शविलेला आहे त्याची माहिती देण्यांत यावी असेही निर्देश देण्यांत आलेले आहेत. त्या विरुध्द सदरचे अपिल आहे.**

**`एखादी परिक्षा घेतल्यानंतर ज्या फॉरमॅटमध्ये उमेदवाराची माहिती विभागाने ठेवलेली आहे त्याच फॉरमेटची फोटो प्रत अर्जदारास देण्यांत यावी. या अगोदर विभागाने काही अर्जदाराची यादी तयार केली होती त्यात रोल नंबर दर्शविण्यांत आले होते. त्यामुळे कोणत्या उमेदवाराची निवड झाली याची माहिती जनतेला मिळू शकत नाही. अर्जदाराचे समाधान होण्याच्यादृष्टीने नावासकट ज्या पध्दतीने विभागाने माहिती तयार केली असेल त्याची प्रत अर्जदारास ७ दिवसाचे आंत देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**दिनांक १६ मार्च २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३८२ /०२**

**श्री.ॲड. याकुब एस.तडवी --अपिलार्थी**
**१६० इदगाह शॉपिंग कॉम्लेक्स**
**एस.टी.वर्कशॉपच्या बाजुला, जळगांव,**
**मु.पो. ता.जि.जळगांव**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक ---उत्तरवादी**
**धुळे वनवृत्त धुळे, जमनागिरी रोड,**
**एस.आर.पी.कॅम्प जवळ,धुळे**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन)**
**धुळे वनवृत्त धुळे, जमनागिरी रोड,**
**एस.आर.पी.कॅम्प जवळ,धुळे**

**-विवेचन-**

**अपीलकार ॲड याकुब एस. तडवी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन)धुळे यांचेकडे दि.१३.८.२००७ रोजी अर्ज करुन श्री.ए.के.निगम, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),धुळे यांचेबाबत एकूण ४ मुद्याबाबत माहिती मागितली होती.**

**जन माहिती अधिका-यांनी मुद्या क्र.२ व ३ बाबत माहिती दि.१७.९.२००७ च्या पत्रानुसार दिली व मुद्या क्र.१ व ४ बाबत माहिती नाकारली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि.६.१०.२००७ रोजी प्रथील अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी दि.१७.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढण्यांत येत असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१७.११.२००७ च्या पत्रानुसार अपीलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत कॅप जळगांव येथे दि.३.२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.**

**सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.**

**वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने श्री.ए.के.निगम, मुख्य वनसंरक्षक यांचेबाबत एकूण ४ मुद्दयांवर अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ बाबत महिती दिली. मुद्दा क्र.१ व ४ बाबत उक्त अधिनिमयातील कलम ८ (१) (जी) (एच)तसेच (आय) नुसार माहिती नाकारली. वन विभागातील व महाराष्ट्र वन विकासमहामंडळातील वरिष्ठ अधिका-यांनी दैनंदिनी सादर करणेबाबत महसूल व वन विभागाचे दि.२८.४.२००५ चे परिपत्रक आहे. यानुसार वरिष्ठ अधिका-यांनी केलेल्या कामाचे मासिक मुल्यमापन करण्यासाठी त्यांनी नियमितपणे दैनंदिनी लिहिणे बंधनकारक केले आहे. यावरुन श्री. निगम यांच्या दैनंदिनी संबंधीची अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपिलकारास गोपनीयतेच्या कारणावरुन नाकारता येणार नाही. वनसंरक्षक यांच्या कार्यालयाने त्यांच्या दि.१७.९.२००५ रोजीच्या आदेशात जो दैनंदिनीचा गोषवाराचा नमुना विहित केला आहे त्यानुसार फक्त आकडेवारीची माहिती त्यात आहे. त्यामुळे या फार्ममधील माहिती देण्यांत यावी. कारण यात अधिनियमाच्या कलम ८ (जी)व ८(एच)लागू पडेल असे काहीही नाही. सहाय्यक वनसंरक्षक या पदाचे मुख्यालय व कार्यक्षेत्र बदलाबबातची माहिती अपीलाकारास आता देता येईल. कारण यासंबंधातील अंतिम निर्णय झालेला आहे वआता ही माहिती देता येईल असे सुनावणीच्या वेळी सांगण्यांत आले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मुद्दा क्र.१ व ४ बाबतची माहिती वर निर्देशिल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.**

**आ दे श**

**अपील मान्य करण्यांत येत आहे. संबंधितांनी उपनिर्दिष्टकार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १२ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३५९ /०२

श्री. भागवत रामदास चौधरी --अपिलार्थी
हेमगिरी बिल्डिग प्लॉट नं.५
नवप्रभात कॉलनी, जिल्हा उद्योग केंद्रामागे,
पोस्ट जळगांव ४२५००१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा संचालक, ---उत्तरवादी
राज्य शिक्षण संचालक कार्यालय(माध्य.व उच्च माध्य)
महाराष्ट्र राज्य, पुणे

जन माहिती अधिकारी तथा विभागीय प्रशासकिय अधिकारी
शिक्षण संचालनालय, (माध्य.व उच्च माध्य
महाराष्ट्र राज्य, पुणे

## -विवेचन-

अपीलकार श्री. भागवत रामदास चौधरी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोग कार्यालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे दि.२०.१२.२००७ रोजी व्दितीलय अपील दाखल केले. अपीलाकराने उक्त माहितीचा अधिकारात जन माहिती अधिकारी तथा राज्य शिक्षण संचालक कार्यालय, (माध्यमिक उच्च )महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे दि.२६.९.२००७ रोजीअर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. जिल्हा तांत्रिक सेवा गट क (शिक्षण)मधुन गट ब ची पदोन्नती सेवाजेष्ठता निकालानुसार का मिळाली नाही.
२. उशिरा दिलेल्या पदोन्नतीस मानीव तारीख देणे बाबतची विनंती का अमान्य झाली.
३. पदोन्नतीचे सर्वसाधारण नियम कोणते १ ते अपीलकाराबाबतीत का डावलले गेले.

याबाबतचा संपूर्ण पत्रव्यवहार व्यक्तीश:पहावयास मिळावा अशी अपीलकाराने मागणी केली होती.

२. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.१२.११.२००७रोजी प्रयत्न अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलाकावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमातंर्गत कॅप

**जळगांव येथे दि.३.२.२००९रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.**

**३. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.**

**४. वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (प्रशासन शाखा)संवर्गातील पदोन्नती उशिरा मिळाली व मानिव तारीख मिळाली नसल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपीलकाराच्या सेवा जेष्ठातेबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (आस्था)यांनी अपिलकारास दि.४.१२.२००७ च्या पत्रान्व्ये माहिती दिली. गट-ब पदावर पदोन्नती उशिराने का दिली व मानिव दिनांक का देण्यांत आला नाही. याबाबत अपीलकारास कागदोपत्री माहिती नसल्याने ती देता येऊ शकलेली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणी अपीलकारा समवेत चर्चा करुन हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आंत अपीलकाराचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्याचे सुनावणीच्या वेळी मान्य केले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.**

## आ दे श

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १२ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८१ /०२

श्री.गणेशराव भास्करराव विंचूरकर(देशमुख) --अपिलार्थी
ओम शांती निवार, कचेरी चौक,
मु.पो.ता.शिंदखेडा जि.धुळे

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा वनसंरक्षक पश्चिम ---उत्तरवादी
धुळे कार्यालय स्टेशन रोड, (एस.आर.पी.)
ग्राऊंडजवळ,धुळे जि.धुळे

जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनपरिक्षेत्र कार्यालय, आदर्श कॉलनी, सिंदखेडा,जि.धुळे

-विवेचन-

श्री.गणेशराव भास्करराव विंचूरकर यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि.२४.९.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपील सादर केले आहे त्याची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव मुक्कामी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि.२०.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये मौजे सिंदखेडा तालुक्यातील वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयामार्फत सन २००३ ते ३१.३.२००७ या कालावधीत रोपवन क्षेत्र मंजूर रक्कम झालेला खर्च, हजेरी पत्रकांची माहिती इत्यादी बाबतची माहिती मागविली होती. त्यासाठी रु.१२९९०/- एवढी फी सुध्दा जमा केली परंतू विहित वेळेत माहिती मिळाली नाही या कारणास्तव दि.४.६.२००७ रोजी प्रथम अपिल केले. तद्नंतर दि.१५४.६.२००७ ते ८.७.२००७ या कालावधीत विविध पत्राव्दारे अपिलार्थीना माहिती पुरविल्याचे नमूद केले आहे. परंतू प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीनी दि.२४.९.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले.

व्दितीय अपिलाची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव येथे आयोजित केलेली होती. त्यावेळी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते त्याची बाजू समजून घेण्यांत आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीमाहिती विस्तृत असल्याने वनक्षेत्रपाल यांनी त्यांचे दैनंदिन कामकाज सांभाळून, उपलब्ध कर्मचारी यांचेकडून अतिरिक्त वेळ देऊन तसेच सदर माहिती छायांकनासाठी भारनियमाचा वाढता कालावधी इत्यादि समस्येमुळे माहिती पुरविण्यास थोडा विलंब झाल्याचे नमूद केले आहे असे असले तरी अपिलार्थीनी

**सुनावणीच्या वेळी जास्त माहिती असल्याने उशिरा परंतू पूर्ण माहिती मिळाली असल्याचे नमूद करुन अर्ज निकाली काढण्याचे सुचविले आहे.**

**मात्र अपिलीय अधिकारी यांनी सहाय्यक माहिती अधिकारी तथा वनक्षेपाल, सिंदखेडा यांचेविरुध्द सौम्य स्वरुपाची दंडात्मक कार्यवाही करणेत यावी अशी शिफारस केली आहे ते योग्य आहे हे लक्षात घेता, सहाय्यक माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सिंदखेडा यांचेवर नाममात्र २०००रुपयाची शास्ती लादत आहे. ती उपवनसंरक्षक,धुळे वन विभाग यांनी अर्जदाराच्या एप्रिल महिन्याच्या पगारातून कापून घेऊन शासनाने विहित केलेल्या बजेट हेडखाली जमा करावी व आयोगास तसा अहवाल पाठवावा.**

**आ दे श**

**अपील व तक्रार अंशतः मान्य करण्यांत येत आहे. संबंधितांनी उपनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १२ मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३८१ /०२**

**श्री. श्री.यादव बाबुलाल बुवा(पत्रकार) --अपिलार्थी**
**मु.सैताळे,पो.फोफरे,ता.जि.धुळे**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ---उत्तरवादी**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, ता.शहादा,**
**जि.नंदूरबार**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, ता.शहादा,**
**जि.नंदूरबार**

**-विवेचन**

**श्री.यादव बाबुलाल बुवा यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.४.९.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपिल केले आहे. सदर अपिलाची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपिलार्थी यांनी दि.५.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातंर्गत जानेवारी २००५ पासून अर्जाच्या दिनांकापर्यत राबविण्यांत आलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती मागविली होती. परंतू मागणी केलेली माहिती विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने दि.२९.५.२००७ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.१२.७.२००७ रोजी आयोजित करण्यांत आली होती. त्यावेळी दि.२.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीना माहिती दिल्याचे निर्देशनास आणण्यांत आल्याने अपिल अधिकारी यांनी अपिल निकालात काढले व तसे दि.१३.७.२००७ रोजी आदेश निर्गमित केले.**

**व्दितीय अपिलाची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी आयोजित केली होती. त्यावेळी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्याची बाजू समजून घेण्यांत आली. तसेच उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन असता अपिलार्थीनी मागणी केलेल माहिती दि.२.६.२००७ च्या पत्राने अपिलार्थीना दिली असल्याचे निर्दशनास आले त्यामुळे सदर प्रकरणात खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १२ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८६ /०२

श्री. नरेंद्र बारकू चौधरी --अपिलार्थी
दैनिक राजरंग टाईम्स,बाफना मार्केट
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ---उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, ता.शहादा,
जि.नंदूरबार

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, ता.शहादा,
जि.नंदूरबार

-विवेचन

अपिलकार श्री. नरेंद्र बारकू चौधरी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.७.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शहादा, जि.नंदूरबार यांच्याकडे दि.२४.४.२००७ रोजी अर्ज करुन सार्वजनिक बांधकाम उपविभाग शहादा कार्यालयामार्फत दि.१.४.२००६ दि.३१.३.२००७ या कालावधीत करण्यांत आलेल्यारस्ते विकास कामाची अनुषंगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसलयाने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२८.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१२.७.२००७ रोजी अंतीम सुनावणी घेऊन आदेश पारित केले. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांनी अपीलकारास सुनावणीचेवेळी माहिती दिली असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपील निकालात काढले. यामुळे समाधान झाले नसल्याने, जन माहिती अध्कि-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत कॅप जळगांव येथे दि.३.२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नवहते.

सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

**वरील विवेचन लक्षात घेता असे दूिसन येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग शहादा यांचेकडे दि.१.४.२००६ ते ३१.३.२००७ या कालावधीत केलेल्या रस्ते विकास कामाबाबत अनुषंगिक माहिती दि.२४.४.२००७ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विलंबाने म्हणजे प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी माहिती दिली. सदर माहिती अपूर्ण असल्याचा व ८० दिवसाने विलंबाने दिली असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात दावा केला आहे. अपीलकारास विलंबाने माहिती देण्यांत येत असल्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीच्यावेळी दखल घेतल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपीलय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. भविष्यात प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी योग्यती दखल घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे. अपीलाकारास जन माहिती अधिका-यानी ८० दिवस विलंबाने माहिती दिली असल्याने त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये शास्ती कां लादण्यांत येऊ नये याबाबत जन माहिती अधिका-यानी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी खुलासा आयोगास सादर करावा.**

**आ दे श**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १७ मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३८८ /०२**

**श्री. सुरेश शंकरलाल शहा --अपिलार्थी**
**सुजीवन हॉस्पीटलसमोर, न्यू प्लॉट,**
**मु.पो.ता.अमळनेर, जि.जळगांव**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा तहसिलदार ---उत्तरवादी**
**जि.नंदूरबार**

**जन माहिती अधिकारी तथा , तहसिल कार्यालय**
**जि.नंदूरबार**

**-विवेचन**

अपिलकार श्री.सुरेश शंकरलाल शहा यांनी केंद्रिय माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अनुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, नंदूरबार यांचेकडे दि.२५.५.२००७ रोजी अर्ज करुन श्री. शंकरलाल गुलाबदास कोपर्ली यांनी त्यांचे नावावरील ओसर्ली येथील गट क्र.७१ ची जमीन त्यांचे हयातील मुलगा व सुन यांचे नावाने कौटूंबिक वाटणीने करुन दिली याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारासदि.२.६.२००७ अन्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी चुकीची माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, नंदूरबार यांचेकडे दि.२.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलिय अधिका-यांनी सुनावणी अयोजित करुन दि.१७.८.२००७ रोजी आदेश पारित केले. अर्जदारास महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९ अन्वये फेरफार नोंद मंजूर करावयाची कार्यपध्दतीबाबत उपलब्ध दस्तऐवजाची नक्कल पुरविण्यांत यावी असे जन माहिती अधिका-यांना प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश दिले. जन माहिती अधिका-यांनी संदिग्ध माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत कॅप, जळगांव येथे दि.३.२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, मौजे ओसर्ली, ता.जि.नंदुरबार येथील गट नं.७१ मधील जमीन क्षेत्र २-३१ हे.आर यावरील वाटणीने झालेल्या फेरफार नोंदीबाबत अपीलकाराने

अनुषंगीक माहिती मागविली होती.  जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली आहे असे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. परंतू अपीलकारास दिलेली माहिती मान्य नाही. त्यांचे सुनावणीच्या वेळी केलेल्या निवेदनात "वाटणीपूर्वी ओसर्ली येथील गट न.७१ श्री. आरविंद शंकरलाल व प्रेमलता अरविंद शहा याची नांवे समाईकात दाखल झालेली नव्हती असे म्हटले आहे. " पण ही याबाबतीतला निर्णय जमीन महसूल संहितेप्रमाणे व्हावयाचा आहे. सदर प्रकरणी माहिती दिली असल्याने मी खालीलप्रमणे आदेश देत आहेञ

**आ दे श**

सबब अपील अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १७ मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४०४७ /०२**

**श्री. शीतलाप्रसाद रामनारायण तिवारी (प्र.शि.)** **--अपिलार्थी**
**आर.एन.पांडे चाळ, रुम नं.५ गमदेवी,**
**घाटकोपर (वेस्ट) मुंबई ४०० ०८६**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी**
**सह आयुक्त (शिक्षण)** **---उत्तरवादी**
**३ रा मजला एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**डॉ.आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई १२**

-विवेचन-

**श्री. शीतलाप्रसाद रामनारायण तिवारी (प्र.शि.)यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.७..२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपिल केले आहे. सदर अपिलाची सुनावणी दि.१८.३.२००९रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**श्री. तिवारी, प्रशिक्षक हे एफ/उत्तर विभागातील नाडकणी पार्क हिंदी म.न.पा. शाळे दि.१.७.१९८४ पासून जोगळेकरवाडी हिंदी म.न.पा. शाळेत १.७.९० ते ३१.१०.१९९४ पर्यत कार्यरत होते. त्यांची दि.३१.३.९४ पासून बेकायदेशीर अनुपस्थिती कामातील निष्काळजीपणा वरिष्ठांच्या आदेशांचे उल्लघंन, विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिका न तपासणे, सहका-याशी उध्दटपणे वागण इ. विविध आरोपाखाली खात्यांतर्गत चौकशी होऊन आरोप सिध्द झाल्यावर त्यांना दि.१.११.१९९४ च्या प्रभावापासून आदेश क्र. इओक्यु/५२० दि.१८.१०.९४ अन्वये सेवेतून काढून टाकण्यांत आलेले होते. अर्जदाराने जो माहितीचा अधिकार अधिनियमाखाली अर्ज केला होता त्या अर्जावरील अपिलाच्या दि.५.२.२००८ रोजीच्या आदेशात अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.**

**" श्रीमती एस.डी.मांडगे, मुख्य लिपिक, प.अ.(शाळा) एफ/उत्तर विभाग यांनी निदर्शनास आणून दिले की, श्री.तिवारी यांच्या प्रकरणाबाबत त्यांच्या कार्यालयाकडे एकूण ११ नस्ती आहेत. तथापि, श्री.तिवारी यांनी त्यांच्या माहितीच्या अधिकारांतर्गत केलेल्या अर्जामध्ये नमूद केलेल्या क्रमांकाची पत्रे आणि प.अ. (शाळा)एफ/उत्तर विभाग यांचेकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे यांच्यामध्ये विसंगती आहे. यावेळी श्री.तिवारी यांनी त्यांच्याकडे सदर पत्रे उपलब्ध आहेत असे सांगितले**

**श्री.तिवारी अपिलकार यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे पुढील ७ दिवसांच्या आंत प्र.अ.(शाळा) एफ/उत्तर विभाग यांना उपलब्ध करुन द्यावीत. त्याप्रमाणे प्र.अ. (शाळा) एफ/उत्तर विभाग यांनी सदर पत्रामध्ये विचारणा केलेली माहिती त्यापुढील १५ दिवसाचे आत श्री. तिवारी यांना उपलब्ध करुन द्यावी."**

**अर्जदारास सदरील माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे उपरोक्त अपिल सादर केले. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे**

**आदेशानुसार विसंगती दूर करण्याच्या दृष्टीने अपिलार्थी यांनी त्यांचे कडील कागदपत्रे त्यांनी जन माहिती अधिका-यांना द्यावयाचे होते व त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी माहिती १५ दिवसांत उपलब्ध करुन द्यावयाची होती. परंतू त्यांच्याकडील कागदपत्रे श्री.तिवारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना माहिती देता येणे शक्य झालेले नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडे कोणकोणती माहिती उपलब्ध आहे, याचे विवेचन त्यांनी सुनावणीच्या वेळेला सादर केले व त्याची एक प्रत अर्जदारास सुध्दा देण्यांत आली. तेव्हा त्या कागदपत्राच्या प्रती हया अर्जदारास ५ दिवसाचे आत देण्यांत याव्यात. तसेच या संदर्भात अर्जदाराच्या अर्जा संदर्भात ११ नस्त्या आहेत असे अपिलीय अधिकारी यांनी आदेशात नमूद केलेले आहे. अर्जदारास त्यांना हवी असणारी माहिती मिळण्याच्या दृष्टीने त्यांनी त्या नस्त्याचे तपासणी करावी व त्यातून अर्जदारास हव्या असलेल्या कागदपत्राची निवड केल्यास त्याही कागदपत्राच्या प्रती देण्यांत याव्यात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८३ /०२

श्री. महेश सदाशिव नेरकर --अपिलार्थी
प्रियदर्शनी नगर, नगांवबारी,
देवपूर धुळे ४२४००५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अपर पोलिस अधिक्षक ---उत्तरवादी
धुळे

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी
धुळे

## -विवेचन-

अपीलकार श्री.महेश सदाशिव नेरकर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, धुळे विभाग, धुळे यांचेकडे दि.१०.७.२००७ रोजी अर्ज करुन धुळे शहरामध्ये सुरळीत वाहतुकीला अडथळा निर्माण करणा-या वाहनाना उचलून नेण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या टोईग वाहनाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यानी अपीलकारास टोईग वाहनाबाबत शासनाने निर्गमित केलेल्या पोलिस आयुक्त, वाहतूक बृहन्मुंबई यांनी निर्गमित केलेल्या आदेशाच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि.११.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन या व्यतिरिक्त शासनाचे परिपत्रक/सूचना कार्यालयात उपलब्ध नसल्याचे प्रथम अपीलीय अधिका-यानी अपीकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत कॅंप जळगांव येीा दि.३.२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, धुळे शहरातील टोईग वाहनाबाबत अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अनुषंगिक माहिती मागितली होती. टोईग वाहनाबाबत पोलिस आयुक्त वाहतूक बृहन्मुंबई व शासनाने निर्गमित केलेल्या

**आदेशाच्या प्रती जन माहिती अधिका-यानी अपिलकारास उपलब्ध करुन दिल्या आहेत. शासनाची अधिसूचना झाली नसल्याने उपलब्ध करुन देता येत नसल्याचे प्रथम अपीलीय अधिका-यानी अपीलकारास कळविले आहे. यावरुन अर्जावर प्रथम अपलीय अधिका-यानी/जन माहिती अधिका-यानी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८७ /०२

श्री. देविदास भिला पाटील, --अपिलार्थी
भालेर त.जि.नंदुरबार

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याध्यापिका ---उत्तरवादी
श्रीमती क.पु.पाटील माध्य.उच्च माध्यमिक विद्यालय,
भालेर ता.जि.नंदुरबार

जन माहिती अधिकारी तथा चेअरमन
शालेय समिती श्रीमती क.पु.पाटील, माध्य.
उच्च माध्यमिक विद्यालय,भालेर ता.जि.नंदूरबार

## -विवेचन-

अपीलकार श्री.देवीदास भीला पाटील यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.८.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.३.३.२००७ रोजी अर्ज करुन श्रीमती क.पु.पाटील कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय भालेर जि.नंदूरबार येथे शिकत आहेत/होत्या का? सदर विद्यालयातील सर्व कर्मचारी मुख्यालयी रहात असल्यास त्यांचे घर नंबरसह पत्रे इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.५.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली. माहिती विहित कालावधीत दिली नाही. अर्जातील मुद्दा क्र.२ चुकीची दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि.३०.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढण्यांत येत असल्याचे प्रथम अपीलीय अधिका-यानी अपीलकारास दि.४.६.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत कॅप जळगांव येथे दि.३.२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी प्रथम अपीलीय अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलाकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.३.३.२००७ रोजी अर्ज करुन दोन मुद्याबाबत माहिती मागितली होती. जन

**माहिती अधिका-यानी अपीलकारास दि.५.४.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झाले नाही. दिलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात दावा केला आहे. परंतू व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्यावेळी अपीलकार हजर राहिले नाही. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४०५३ /०२

श्री.प्रियेश भेडा --अपिलार्थी
१००१-अे, कस्टम्स क्वाटर्स,
लॉईड इस्टेट, वडाळा, मुंबई ४०० ०३७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त ---उत्तरवादी
मध्य परिमंडळ लोहमार्ग, मुंबई कार्यालय,
सिग्नल निरिक्षक इमारत, १ ला मजला,
ना.म.जोशी मार्ग, भायखळा (प) मुंबई ४०० ०२७

जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त (प्रशासन)
वाडीबंदर, लोहमार्ग, मुंबई.

-विवेचन-

श्री. प्रियेश भेडा यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.१.१०.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपिल केले आहे. सदर अपिलाची सुनावणी दि.१९.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी, अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराच्या मुळ अर्जामध्ये व माहिती अधिकार अधिनियमाखाली केलेल्या अर्जानुसार दिलेल्या माहितीचे जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

अर्जदार श्री.प्रियेश भेडा यांनी माहितीचा अधिकार २००५ अन्वये दादर रेल्वे पोलिस ठाणे गुन्हा रजि.क्र.२३४/०७ कलम ३२३,५०४,५०६व गुन्हा रजि.क्र.२४४/०७ कलम ३५४,३२३,५०४,५०६ भादवी प्रमाणे गुन्हयाचे संदर्भात १. दि.१८.२.२००८ २) १५.४.२००८ ३)१०.५.२००८ ४) १२.६.२००८ ५) २४.६.२००८ ६)७.७.२००८ ७)७.७.२००८ ८) २४.७.२००८ रोजी अर्ज केले आहेत. त्याप्रमाणे सर्व अर्जाची माहिती त्यांना पुरविण्यांत आलेली आहे. त्यामधील अ.क्र.८ अन्वयेच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यांत आलेली आहे. परंतू सदर माहितीने त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कडे अपील केले असून दि.२९.८.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे पअील निकाली काढले आहे.

श्री.प्रियेश भेडा यांनी दि.२४.७.२००८ रोजीचे अर्जान्वये मागितलेल्या माहितीमध्ये रा.पो.निरीक्षक श्री.कुलकर्णी व फिर्यादी श्री. जवाहर नाडर यांचेतील झालेली तोंडी चर्चची माहिती मागितली आहे. सदर माहिती दादर पोलिस ठाणे अभिलेखावर उपलब्ध नसल्याने त्यांना लेखी कळविण्यांत आले आहे.

गु.र.क्र.२४४/०७ कलम ३५४,३२३,५०४,५०६ भादवी हा गुन्हा सौ.विजयालक्ष्मी नाडर यांचे दि.१८.११.२००७ रोजीचे अर्जाचे अनुषंगाने दाखल करण्यांत आला असून त्या अर्जाची छायांकित प्रत अर्जदार यांना माहितीचे अधिकारान्वये पुरविण्यांत आलेली आहे.

**अपिलकर्त्याचे म्हणणे असे की, जी तोंडी चर्चा झाली होती त्याचे रेकॉर्डिंग व्हायला पाहिजे होते त्या रेकॉर्डवरुन माहिती दिलेली दिसत नाही. जे कागदपत्र अस्तित्वात नाही ते उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही. त्यामुळे अर्जदाराने दाखल करण्यांत आलेल्या तक्रारी या संदर्भातील पोलिस स्टेशनमध्ये असलेले सर्व कागदपत्रे अर्जदारास मिळालेले आहेत असेही सुनावणी वेळी सांगितले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.**

**आ दे श**

**सबब अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

दिनांक १९ मार्च २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३९२९ /०२

श्री.अनिल वसंत थरथरे --अपिलार्थी
ब-७८/७७६
एम.आय.जी.कॉलनी,
गुरुनानक हॉस्पीटल जवळ,
वांद्रे (पूर्व),मुंबई ५१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी ---उत्तरवादी
बृहन्मंबई नगरपालिका महात्मा ज्योतिबा फुले मंडई,
१ ला मजला, डॉ.डी.एन.रोड, मुंबई ४०००१

-विवेचन-

श्री. अनिल वसंत थरथरे, अपिलार्थी यांनी माहितीच्या अधिकारात दि.२४.१.२००८ रोजी शास्त्रीनगर म्युनिसिपल मंडई, संत ज्ञानेश्वर मार्ग, नगर भूमापन क्रमांक ६२९ (भाग)सर्व्हे क्रमांक ३४१ बांद्रा (पूर्व)मुंबई ४०० ०५१ बाबत एकूण आठ मुद्यांची माहिती मागितली होती. तथापि आठ मुद्यांपैकी मुद्दा क्र.१ ची माहिती सहाय्यक अधिक्षक (बाजार)विभाग-३ यांच्याशी मुद्दा क्र.२ व ३ ची माहिती कार्यकारी अभियंता (एस.आर.ए.)यांच्याशी तर मुद्दा क्र.५ ची माहिती सहाय्यक आयुक्त (एन/पूर्व) यांच्याशी संबंधित असल्याने त्या त्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अर्जाची प्रत पाठविण्यांत आली व उर्वरित मुद्दा क्रमांक ६ ची माहिती देऊन ४,७ व ८ ची माहिती सहाय्यक अभियंता (बाजार)प्रभारी तथा जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.३.३.२००८च्या पत्रान्वये शुल्क भरणा केल्यावर देण्याचे कळविले होते.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी दि.२९.५.२००८ रोजी सहायक आयुक्त (बाजार)तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील केले. त्यावर दि.३०.६.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलीय प्राधिका-यांनी दि.१.७.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशात जी माहिती सहाय्यक आयुक्त एच/पूर्व व कार्यकारी अभियंता (एस.आर.ए)यांचेशी संबंधित आहे ती त्यांच्या कार्यालयाकडूनच घेणे जास्त संयुक्तिक ठरेल, असे मत नोंदवून (१)सहा अधिक्षक (बाजार)३ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी व (२)सहाय्यक अभियंता (बाजार)तथा जन माहिती अधिकारी यांना उद्देशून शास्त्रीनगर मंडईबाबत जी काही अन्य कागदपत्रे त्यांच्याकडे असतील ती त्यांनी श्री.अनिल थरथरे (अपिलार्थी)यांना एक महिन्याच्या कालावधीमध्ये देण्यांत यावी असे आदेश दिले होते.

प्रथम अपिलावरील आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी पूर्ण माहिती पुरविली नाही. तसेच विशेषतः मुद्दा क्रमांक २ व ३ मध्ये मागितलेली माहिती सहाय्यक आयुक्त (बाजार) यांच्या कार्यालयात उपलब्ध असतना जन माहिती अधिकारी यांनी ती न देता त्याबाबत माहिती देण्यासाठी अर्जाची प्रत जाणूनबुजून कार्यकारी अभियंता (एस.आर.ए.)बांद्रा (पूर्व) मुंबई यांच्या कार्यालयात पाठविण्यात आल्याबद्दल तसेच इतर मुद्दाची माहिती देखील अपूर्ण व चुकीची दिल्याबद्दल अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.९.२००८ रोजी व्दितीय अपिल तक्रारीसह दाखल केले होते.

**अपिलार्थी यांच्या उक्त व्दितीय अपिलावर दि.६.३.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. त्यावेळी अपिलार्थी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (बाजार)व जन माहिती अधिकारी म्हणून (१)सहाय्यक अभियंता (बाजार)व (२)सहाय्यक अधिक्षक (बाजार)प्रथम अपिलीय अधिकारी हे उपस्थित होते.**

**सुनावणीच्यावेळी सहाय्यक आयुक्त (बाजार)तथा अपिलीय प्राधिकारी तसेच सहाय्यक अभियंता (बाजार)तथा जन माहिती अधिकारी यांनी संयुक्तपणे सादर केलेल्या अहवालानुसार अपिलार्थी यांनी आपल्या मुळ अर्जामध्ये विचारलेली बाजार विभागाशी संबंधित तसेच बाजार विभागाच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना कळविण्यांत आली असल्याचे दिसून आले.**

**प्रस्तुत प्रकरणी सर्व माहिती अपिलार्थीस दिली असल्याने पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

दिनांक १८ मार्च २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३६९ /०२**

**श्री. जुलाल बळीराम वाघ --अपिलार्थी**
**जेष्ठ नागरीक,**
**राऊळवाडी, चितोड रस्ता**
**धुळे (महाराष्ट्र)**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी ---उत्तरवादी**
**महानगरपालिका, धुळे**

**-विवेचन-**

**श्री.गुलाब बळीराम वाघ यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि.२९.८.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपील सादर केले आहे त्याची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपिलार्थी यांनी दि.१५.३.२००७ च्या अर्जान्वये धुळे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील विविध समस्या, पुरेशा मूलभूत सुविधा पुरविणेच्या अनुषंगाने महानगरपालिकेला पाठविलेल्या विविध पत्रांवर केलेल्या कार्यवाहीसंबंधीत अधिकारी यांची नांवे, सदर अधिकारी दोषी असल्यास त्यांच्याविरुध्द केलेली कारवाई इ. स्वरुपाची माहिती मागविली होती. परंतू सदर माहिती अपिलार्थींना पुरविली नसल्याने त्यांनी दि.५.५.२००७ रोजी प्रथम अपिल केले. प्रथम अपिलाची दि.५.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती १५ दिवसांत देण्यांचे दि.१६.६.२००७ रोजी आदेश निर्गमित केले, असे असले तरी अपिलार्थींना पूर्णपणे माहिती मिळाली नाही असे नमूद करुन दि.२९.८.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.**

**व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्याची बाजू ऐकून घेण्यांत आली अपिलार्थी उपस्थित नव्हते. परंतू त्यांनी दि.२.२.२००९ रोजी लेखी कळविले आहे की, त्यांना माहिती मिळाली आहे. त्यामुळे त्यांचे समाधान झाले आहे. त्याची अपिलाबाबत काही तक्रार नाही. शिवाय सदर प्रकरणातील आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.**

**अपिलार्थींना माहिती मिळाली असल्याने व त्यांची काही तक्रार नसल्याने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १९ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४००५ /०२

श्री. नरेंद्र भिकाजी सावंत --अपिलार्थी
इमारत क्र.५/१४८,
१४८, सहकार नगर-५ चेबूर ,मुंबई ४०० ०७१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,(इस्टेट) ---उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पश्चिम विभाग,
शरदभाऊ, आचार्य मार्ग, चेंबूर मार्ग ४०० ००७१

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का)
बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पश्चिम विभाग,
शरदभाऊ, आचार्य मार्ग, चेंबूर मार्ग ४०० ००७१

-विवेचन-

श्री. नरेंद्र भिकाजी सावंत यांनी दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी दि.१६.३.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अर्जदारास माहिती देण्यास उशिर का झाला या संदर्भात शास्ती लादण्यांत का येऊ नये याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्ष येऊन सादर करण्याबाबत निर्देश दिलेले होते. दिनांक २०.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहून खुलासा आयोगास सादर केला आहे. तो पुढीलप्रमाणे आहे.

नरेद्र भिकाजी सावंत यांनी दि.२२.९.२००८ रोजी अर्ज सादर करुन माहिती मागितली होती. सदरहूं माहिती त्यांना दि.२१.१०.२००८ रोजी क्र.सआ/ एम/प/७२०३९०३३१/इ व क अन्वये देऊन सोबतच्या अभिलेखाची प्रत प्राप्त करण्यासाठी रु.२/- कार्यालयात भरण्यासाठी कळविण्यांत आले होते. परंतू सदरचे पत्र श्री. सावंत यांना मिळण्यापूर्वीच श्री. सावंत यांनी दि.२४.१०.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,एम/प यांच्याकडे अपील केले होते. त्यावेळी श्री.सावंत यांना रोख रकमेचा भ्झरणा (रु.२/-)करुन माहिती नेण्यास सांगितले होते. सदर अपिलाचा आदेश क्र.सआ/एप/प/७२०४१७६४३/ इ व का दि.१२.१२.२००८ अन्वये पारित केला होता. त्यानंतर श्री. सावंत यांनी व्दितीय अपिलासाठी आयोगाकडे अर्ज केला आहे.

श्री.सावंत यांनी ज्याबाबत माहिती मागितली आहे त्या प्रकरणाबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे.

दि.२१.६.००८ रोजी श्री.नरेद्र सावंत या नावाने मनपा आयुक्ताकडे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीमध्ये म्हटल्याप्रमाणे रु.नं.३३५ इ.क्र.११, सहकार नगर नं.३ चेंबूर येथे राठोड वैद्यकिय व्यवसाय करीत असून त्यांचा दवाखाना बेकायदेशीर आहे म्हणून

**कळविले होते. वास्तविक पाहता दवाखान्याच्या बांधकामाबाबतची अधिकृतता एवढाच भाग स.अभि. (इ. व का.)यांचे अखत्यारित येतो. म्हणून यासंबंधी श्री.नरेंद्र सावंत यांना उत्तर पाठवून त्याची प्रत उपमुख्य अधिकारी (डब्ल्यू)म्हाडा यांना पाठविली होती.**

**त्यानंतर श्री.सावंत यांनी माहितीच्या अधिकारान्वये म्हाडाकडे पाठविलेल्या पत्राची प्रत मागितली होती. वास्तिवक उत्तरादाखल मूळ पत्रच श्री.सावंत यांना पाठवून त्याची प्रत म्हाडास पाठविलेली असल्यामुळे त्यात पुन्हा नविन प्रत मागण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. परंतू तरीही त्यांना सदर प्रतिसाठी रु.२/-भरणा करण्यासाठी कळविण्यांत आले होते. नंतर त्यांनी वरीलप्रमाणे प्रथम व व्दितीय अपिलासाठी अर्ज केलेले आहेत.**

**या कार्यालयाने त्यानंतर देखील दि.६.२.२००९ रोजी उपमुख्य अधिकारी म्हाडा यांच्याशी पत्रव्यवहार करुन आवश्यकती कारवाई करण्यासाठी स्मरणपत्र पाठविले आहे. त्याची प्रत तक्रारदारास पाठविली आहे. त्यामुळे मी सावंत यांच्या तक्रारीची दखल घेतली असे दिसून येईल. माहिती अर्जाबाबतच्या कागदपत्राच्या छायांकित प्रती माहितीसाठी सोबत जोडल्या आहेत.**

**खुलासा मान्य करण्यांत येत आहे व शास्तीचे प्रकरण बंद करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

दिनांक १९ मार्च २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३६४/०२**

**श्री. संतोष म्हादू बागले --अपिलार्थी**
**२१,उदयनगर, विद्यावर्धिनी कॉलेजजवळ**
**साव्ही रोड, धुळे.**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती आधिकारी ---उत्तरवादी**
**धुळे तहसिल माहिती अधिकारी,धुळे**

**-विवेचन-**

**श्री.संतोष म्हादू बागले यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि.१४.११.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपील सादर केले आहे त्याची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**श्री.संतोष म्हादू बागले, यांनी जन माहिती अधिकारी, तहसिलदार धुळे यांच्याकडे अर्ज करुन गट नं.५१/२-ब,४०-आर हया शेतीबाबत केलेल्या नोंदी बेकायदेशीर असल्यामुळे तलाठी यांचे विरुध्द कारवाई करावयाची झाल्यास काय करावे लागेल, याची माहिती विचारली. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार अस्तित्वात असलेली माहिती देता येऊ शकते सल्ला देणे हे अभिप्रेत नाही.**

**नोंदीबाबत दिलेला निर्णय मान्य नसेल तर महाराष्ट्र जमिन महसूल संहितेप्रमाणे त्या नोंदी विरुध्द अपिल करण्याची तरतूद त्या कायदयामध्ये आहे. सुनावणीवेळेला मात्र वरील कायदेशीर तरतूदीची जाणीव होऊन अर्जदाराने असे लिहून दिलेले आहे की, सदर नोंदीबाबत उप विभागीय अधिकारी,धुळे विभाग यांच्याकडे त्या कायद्यानुसार अपील दाखल करण्यांत आले असून सदर अपिलाचा निर्णय प्रलंबित आहे. त्यामुळे तूर्तास माहितीच्या अधिकारात मागणी केलेली माहिती त्यांना नको आहे, असे अपिलार्थीनी कळविले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक २३ मार्च २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४०३३ /०२

श्री. रुपचंद लौंगानी, --अपिलार्थी
६, फाऊन्टन हेड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.
१३३, एस.व्ही.रोड, खार, मुंबई-५२

१.प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्रबधंक --उत्तरवादी
राज्य ग्राहकवाद निवारण आयोग,
जुने प्रशासकिय महाविद्यालय, हजारीमल सोमाणी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर,मुंबई -४०००१
२.जन माहिती अधिकारी
राज्य ग्राहकवाद निवारण आयोग,
जुने प्रशासकिय महाविद्यालय, हजारीमल सोमाणी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर,मुंबई -४०००१

-विवेचन-

श्री. रुपचंद लौंगानी यांनी दि.९ जानेवारी २००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल सादर केले होते. त्या अपिलाची सुनावणी दिनांक २३.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२२.४.२००८ रोजीच्या अर्जान्वये माहिती अधिकारी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्याकडे अर्ज करुन प्रकरण क्र.५२/१९९८ शी संबंधित माहिती मागितली होती. त्यात दि.२१.१.२००८ रोजी युक्तीवाद पूर्ण होऊन केस आदेशासाठी राखून ठेवलेली होती ते आदेश पारित झाल्याची तारीख, तसेच जावक रजिस्टरमधील याच्या नोंदी केल्याच्या तारखेबाबत माहिती विचारली होती. त्यांना दि.२७.५.२००८रोजीच्या पत्राने हे प्रकरण निकालासाठी राखून ठेवलेले आहे. सदर प्रकरणाचे श्रुतलेखन लघुलेखकास देण्यांत आलेले आहे त्याचे टंकलेखन पूर्ण होऊन ते प्रकरण स्वाक्षरीसाठी ठेवण्यांत आलेले आहे अशी माहिती देण्यांत आली, त्याने समाधान न झाल्याने सादर केलेल्या अपिलाच्या सुनावणीस अपिलकर्ते गैरहजर राहिले म्हणून दोनदा सुनावणी पुढे ढकलून नंतरच्या सुनावणीच्या वेळीहि अर्जदार गैरहजर राहिल्याने दिलेली माहिती योग्य आहे असे निर्वाळा देऊन प्रथम अपिल खारीज करण्यांत आले.

व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तेव्हाच्या सद्य:स्थितीप्रमाणे दिलेली माहिती बरोबर आहे असे आयोगाचे मत झालेले आहे.

अपिलार्थी यांचे मात्र दोन मुद्दे आहेत की, १. अपिलार्थी यांचा दि.२२.४.२००८ रोजीचा अर्ज कंझ्युमर आयोगास दि.२३.४.२००८रोजी प्राप्त झाला व जन माहिती अधिकारी यांनी २७.५.२००८ रोजी पाठविलेले पत्र अपिलार्थीस पत्र हे दि.४.६.२००८ रोजी पोस्टाने मिळाले. म्हणजेच एक महिन्याचा कालावधी उलटून गेल्यानंतर त्यांना हे पत्र मिळालेले आहे. दि.२३.४.२००८ च्या अर्जानुसार माहिती दि.२३.५.२००८ पर्यत देणे आवश्यक होते. पोस्टात लागलेला कालावधी जरी वगळला तरी माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार हा अर्ज प्रत्यक्षात त्यांना २०.५.२००८ रोजी प्राप्त झाला व त्यांनी २७.५.२००८ रोजी त्याला उत्तर दिलेले आहे. म्हणजेच मुदतीत उत्तर देण्याच्या बाबतीत त्यांचेकडून खोटी झालेली नाही. दि.२३.४.२००८ रोजी दाखल झालेले पत्र हे जन माहिती अधिकारी यांचेपर्यत पोहोचायला दि.२०.५.२००८ तारीख उजडावी, ही बाब अतिशय गंभीर आहे. तेव्हा आयोगाच्या प्रबंधकानी माहितीचा अर्ज दाखल झाल्यानंतर शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी हा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या पर्यत पोहोचेल याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. या विविक्षित केसमध्ये रजिस्ट्री ते जन माहिती अधिकारी यांचेपर्यत अर्ज पोहचावयास इतका उशीर कां लागला याची चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करावी तसेच यापुढे असे होणार नाही याचीही काळजी घ्यावी.

अर्जदाराचा दुसरा मुद्दा असा की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देण्यास उशीर लावला हा आहे. मात्र असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या दि.५.६.२००८ रोजीचे अपील हे दि.४.७.२००८ रोजी सुनावणीसाठी लावले होते. पण अर्जदाराने सुनावणीसाठी नेमलेल्या दिवशी येणे शक्य नसल्याचे कळविल्यामुळे पुढील तारीख देण्यांत आली. त्या तारखेला सुध्दा अपिलकर्ते हजर राहिले नाहीत व दूरध्वनीवरुन पुढील तारीख मिळण्याची विनंती केली होती. त्यामुळे अंतिमतः १० तारखेला सुनावणी ठेवून त्याही सुनावणीच्या वेळेला अपिलकर्ते गैरहजर राहिले असल्यामुळे अपिलीय अधिकारी यांना निर्णय पारित केला. म्हणून असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी याच्या प्रथम सुनावणीच्या दिवशी जर अर्जदार उपस्थित राहू शकले असते तर वेळेत अपीलाचा निर्णय देता येऊ शकला असता. या सर्व बाबी मुळे पुढील निर्णय देण्यांत येत आहे.

**आ दे श**

अपील अमान्य करण्यांत येत आहे.
प्रबंधकानी वर दर्शविल्याप्रमाणे चौकशी करुन कार्यवाही करावी.

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

दिनांक २३ मार्च २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४०६४ /०२**

**श्री. मोहमद युसुफ फारुख खान --अपिलार्थी**
**बी/८,मुस्तफा चाळ, अचानक नगर**
**मुब्रा, जि.ठाणे ४०० ६१२**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव (ज-१) ---उत्तरवादी**
**महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (ज-१)**
**महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२**

**-विवेचन-**

**श्री. मोहमद युसुफ फारुख खान यांनी दि.१०-१२-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल सादर केले होते. त्या अपिलाची सुनावणी दिनांक २३.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपिलार्थी यांना सन २००१ पासून आजपर्यंत अंध अपंगाना निवासासाठी वाणिज्यिक व औद्योगिक प्रयोजनासाठी विनालिलावाने जमीन मिळण्याबाबत सर्व जिल्हयातून किती अर्ज प्राप्त झाले व शासनाकडून किती जागा वाटप करण्यांत आल्या याची माहिती पाहिजे होती. ही माहिती त्या त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांचेकडून मिळेल असे प्रथम अपिलीय निर्णयात स्पष्ट करण्यांत आले व अर्जदारास या सर्व जिल्हाधिका-यांची नावे कळविण्यांत आली. अशा प्रकारची एकत्रित सर्व माहिती मंत्रालयात ठेवण्यांत येत नाही, असेही प्रथम अपिलीय निर्णयात स्पष्ट केलेले आहे.**

**अर्जदारास ज्या जिल्हाधिकारी यांचे कडील माहिती पाहिजे असेल त्या जिल्हाधिकारी कार्यालयास अर्ज करणे योग्य राहिल व ते अर्जदाराने मान्य केले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक २३ मार्च २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४०६६ /०२**

**श्री. चेतन कोठारी --अपिलार्थी**
**५२, ओशियानिक अपाटमेंट,**
**डॉ.राजाबली पटेल लेन, बी देसाई रोड,**
**मुंबई २६**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियता**
**(इमारत प्रस्ताव)शहर -- उत्तरवादी**
**बृहन्मुंबई मनपा कार्यालय, ई वॉर्ड कार्यालय ३ रा मजला,**
**१० शेख हफिसुद्दीन मार्ग, भायखळा (प)मुंबई ०८**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**(इमारत प्रस्ताव)शहर-३**
**बृहन्मुंबई मनपा कार्यालय, ई वॉर्ड कार्यालय ३ रा मजला,**
**१० शेख हफिसुद्दीन मार्ग, भायखळा (प)मुंबई ०८**

**-विवेचन-**

**श्री. चेतन कोठारी यांनी दि.८-१-२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल सादर केले होते. त्या अपिलाची सुनावणी दिनांक २३.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदारास तेज गौरव हाऊस, १०९-तेलंग रोड,२ मालक श्रीमती भारती सुरेद्र खंदार माटूंगा, पूर्व, मुंबई यांना बी.एम.सी. ने दिलेल्या किंवा न दिलेले दुरुस्तीच्या परवानगीबाबत काही माहिती पाहिजे होती. अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास यासंदर्भात तेव्हा सोपविलेल्या नस्त्याची पाहणी करण्याची विनंती अर्जदारास केलेली होती. आयोगाकडील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, या संदर्भातील एक नस्तीतील प्रस्तावास मुंबई महापालिकेने परवानगी दिलेली नाही दुस-या प्रस्तावाची नस्ती सापडत नाही तरी त्याच्या ॲबस्ट्रॅक्टवरुन असे दिसते की, २००३ साली दुसरा प्रस्ताव आला होता परंतू त्या प्रस्तावास सुध्दा मंजूरी देण्यांत आली नाही. अर्जदारास हे कागदपत्र पहावयास मिळू शकतात व आवश्यकता भासल्यास तसे करण्याचे अर्जदाराने मान्य केले. वरील परिस्थिती ही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी कळवावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २३ मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४०९८ /०२**

**श्रीमती. यशोदा दत्ताराम रावुळ** **अपिलार्थी**
**वृंदावन को.हॉ.सो. रु.न. अेफ ४२४,**
**मजासवाडी, गुंफा रोड, बाबुभाई मोखाला चाळ कपाऊंड,**
**जोगेश्वरी पूर्व मुंबई.**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त,**
**परिमंडळ-९हिल रोड** **-- उत्तरवादी**
**बांद्रा (प),मुंबई ४०० ०५०**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त्,**
**पश्चिम प्रादेशिक नियंत्रण कक्ष,**
**बांद्रा (प) मुंबई ४०० ०५०**

## -विवेचन-

**श्रीमती. यशोदा दत्ताराम रावुळ यांनी दि.२०-१-२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल सादर केले होते. त्या अपिलाची सुनावणी दिनांक २५.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना समाधानकारक माहिती दिलेली आहे असे दि.११.१२.२००८ च्या आदेशात नमूद केलेले आहे. अर्जदारास दि.३०.१.२००४ व दि.३१.१.२००४ च्या विलेपार्ले पोलिस ठाणे येथील लॉकअप नोंदीच्या पुस्तकाची सत्यप्रत, यांना पाहिजे होती. अर्जदारास २००४ सालच्या लॉकअप पुस्तकाची प्रत पाहिजे आहे. एवढा कालावधी ही माहिती दिल्याने सुरक्षितता बिघडेल असे वाटत नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत अहे.**

## आ दे श

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे. वर निर्देशिल्यापमाणे १० दिवसांत अपिलार्थीस माहिती देण्यांत यावी**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**दिनांक २५ मार्च २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४०८९ /०२**

**श्री. चेतन कोठारी --अपिलार्थी**
**५२, ओशियानिक अपाटमेंट,**
**डॉ.राजाबली पटेल लेन, बी देसाई रोड,**
**मुंबई २६**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त,**
**परिमंडळ-२ सर जे.जे.नागपाडा, --उत्तरवादी**
**मुंबई ४०० ००८**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त्,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे.नागपाडा,**
**मुंबई ४०० ००८**

**-विवेचन-**

**श्री. चेतन कोठारी यांनी दि.२३-१२-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल सादर केले होते. त्या अपिलाची सुनावणी दिनांक ३०.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**श्री. चेतन कोठारी यांना कोर्टाकडून जारी केलेले बेलेबल व नॉनबेलेबल वॉरंट समन्स किती बजावण्यांत आले व किती बजावण्यांत येऊ शकले नाही, याबाबतची माहिती पाहिजे होती. याबाबतची काही पोलिस स्टेशनमधील माहिती मिळालेली होती व काही पोलिस स्टेशनची माहिती देण्याचे निर्देश हे अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि.२८.११.२००८ रोजी दिलेले होते. मात्र माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे व्दितीय अपील सादर करण्यांत आले.**

**सुनावणीच्या वेळी अर्जदारास हवी असणारी उर्वरित पोलिस स्टेशन्स डोंगरी, मरीनलाईन्स, आझाद मैदान या तीन पोलिस स्टेशनची माहिती ३ दिवसांत देत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अर्जदारास हवी असणारी माहिती ही नावानिशी द्यावयाची असल्यामुळे व अतिव्याप्त स्वरुपाची असल्यामुळे ती नोव्हेंबर २००८ अखेरीस मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर बराच कामाचा ताण असल्यामुळे ती प्राप्त करुन देऊ शकली नाही, असे सांगण्यांत आले. ही बाब अपवादात्मक असल्यामुळे माहिती देण्यास झालेला विलंब क्षमापित करण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे अर्जदारास हवी असणारी माहिती तीन दिवांत पुरवावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३५२/०२**

**श्री.जितेद्र हरिभाऊ ठाकूर --अपिलार्थी**
**रा.अमळनेर जिल्हा जळगांव**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी ---उत्तरवादी**
**प्राचार्य, प्रताप महाविद्यालय, अंमळनेर जिल्हा जळगांव**

**-विवेचन-**

**श्री. जितेंद्र हरिभाऊ ठाकूर यांनी दि.१२.१२.२००७ रोजी आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपिल केले त्या अपिलाची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेला जन माहिती अधिकारी उपस्थित होते. परंतू अपिलार्थी उपस्थित नव्हते.**

**अपिलार्थी यांनी दि.२५.७.२००७ रोजी श्री.के.बी.जैन, ज्युनियर क्लार्क यांच्या स्टेनो ग्रेडच्या प्रमोशनच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली होती. परंतू माहिती विहीत वेळेत न मिळाल्याने दि.२७.१०.२००७ रोजी प्रथम अपिल केले. अपिलार्थीना दि.२६.११.२००७ रोजी छायांकित प्रतीसह उत्तर दिल्याचे आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला नमूद केले आहे.**

**सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्यांची बाजू समजून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थीनी विचारलेली माहिती त्यांना पुरविण्यांत आल्याचे तसेच आठ दिवसांत पुन्हा माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे. तेव्हा अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत अपिलार्थीना देण्यांत यावी. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० मार्च २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४१११/०२**
**अपील क्रमांक २००९/ ४११२ /०२**

**श्री. नेताजी गोपीचंद शिंदे,** **अपिलार्थी**
**२०४, साई सिध्दीविनायक, इमारत क्र.१**
**सुकरवाडी, म.गांधी मार्ग, बोरीवली (पूर्व)**
**मुंबई ४०० ०६६**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९** **--उत्तरवादी**
**बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९**
**बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१**

**-विवेचन-**

**वरील दोन्ही अपिलात अर्जदारास सोलापूर जिल्हा उन्नती को.ऑप क्रे.सोसायटी लि.सुकरवाड, महात्मा गांधी मार्ग, बोरीवली (पूर्व)मुंबई यांच्या संबंधी माहिती पाहिजे होती व अर्जदारास हवी असणारी माहिती ही संस्था पातळीवर उपलब्ध असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश संस्थेला देण्यांत आले. सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी अनुपस्थित होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, संबंधित संस्थेचा तपासणी अहवाल व अर्जदारास हवी असणारी कागदपत्रेही देण्यांत आलेले आहेत. कदाचित त्यामुळे अर्जदार सुनावणीस उपस्थित राहिले नसावेत.सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.**

**आ दे श**

**वरील दोन्ही अपीले निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३१ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४११६/०२

श्री. सदानंद बापू खडपे -- अपिलार्थी
ऑफीस इमारत नं.१८, रुम नं.२,
इमारत क्र.१३५, च्या बाजुला, कन्नमवार नगर,
नं.२, विक्रोळी,(पूर्व)मुंबई ८३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(स्थापत्य)
उपमुख्य अभियंता (स्थापत्य)मुंबई मंडळ, --उत्तरवादी
म्हाडा.वांद्रे मुंबई.५१

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
घाटकोपर विभाग,म्हाडा मुंबई मंडळ,
वांद्रे, मुंबई ५१

-विवेचन-

श्री. सदानंद बापू खडपे यांनी दि.२.२.२००९ रोजी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपिल केले त्या अपिलाची सुनावणी दि.३१.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी असे लक्षात आले की, अर्जदारास माहिती नको आहे मात्र मुख्य अधिकारी मुंबई मंडळ म्हाडा यांच्या आदेशावरुन मिळकत व्यवस्थापन यांनी अभिहस्तांतरण करण्यासाठी गाळेधारकांच्या जागेचा नकाशा व दोन्ही गाळेधारकांची माहिती मिळकत व्यवस्थापन क्र.३ मुंबई मंडळ यांच्याकडे लवकरात लवकर पाठविण्यांत यावी अशी त्यांची अपेक्षा आहे. या संदर्भात करीत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप हे उपअभियंता हौसिंग, घाटकोपर सब-डिव्हिजन-१ यांनी इस्टेट मॅनेजर-३,म्हाडा यांना दि.२५.२.२००८ रोजी यांना पाठविलेल्या पत्रात विषद केलेले आहे. त्याची प्रत अर्जदाराकडे उपलब्ध आहे. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

आ दे श

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ३१ मार्च २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४११७ /०२

श्री. सी.के.सुवर्णा, --अपिलार्थी
२५ शांतास्मृती को.ऑप हॉ.सोसायटी
वि.रा.देसाई रोड,अंधेरी (पूर्व)मुंबई ५३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता
यांचे कार्यालय, मुंबई (सा.बां.)मंडळ, -- उत्तरवादी
२५, मर्झबान रोड, फोर्ट,मुंबई ४०००१

जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विभाग, अंधेरी, मुंबई.

-विवेचन-

श्री. सी.के.सुवर्णा, यांनी दि.७.२.२००९ रोजी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपिल केले त्या अपिलाची सुनावणी दि.३१.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास २००६ साली झालेल्या शांतास्मृती को.सोसायटी.अंधेरी या सोसायटीच्या दुरुस्तीच्या कामासबंधी केलेल्या मुल्यांकनासंबंधी काही माहिती पाहिजे होती व ती माहिती अर्जदारास शुल्क घेऊन देण्यांत आलेली आहे. मात्र त्यांने समाधान न झाल्याने केलेल्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्या दि.२०.११.२००८ रोजीच्या आदेशानुसार अर्जदाराने मागितलेल्या माहितीत बरेच प्रश्न विचारलेले आहेत. अर्जदाराला प्रश्नाच्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ते उपलब्ध करुन देण्यांत यावे. मात्र अर्जदाराची अपेक्षा त्यांच्या प्रश्नाची पीन पॉईटेड उत्तर द्यावीत असे दिसते. माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात द्यावयाची आहे. त्या दृष्टीने अर्जदारांना हवी असल्यास नस्तीची पाहणी करुन संबंधित नस्तीतील जे कागदपत्र त्यांना पाहिजे असतील त्या कागदपत्राच्या त्यांना सशुल्क देण्यांत याव्यात. अर्जदार कागदपत्राची तपासणी करीत असताना त्यांना उत्तरे शोधण्यांत जन माहिती अधिकारी यांनी मदत करावी. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३१ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३१५ /०२

श्री. ॲड शामकांत जे. शिंदे --अपिलार्थी
व्दारा - बी.एन.भालेराव रुम नं.५
एस.टी.कॉटर,नवी बस स्टॅड मध्ये जळगांव ता.जि.जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता ---उत्तरवादी
डिव्हिजन एम.एस.टी.सी.लि.धुळे

जन माहिती अधिकारी तथा अति उच्चदाब(स.व सु.)
मंडळ,म.रा.विप.मंडळ भुसावळ, जि.जळगांव

-विवेचन-

ॲड.शामकांत जे.शिंदे यांनीआयोगाकडे दि.२५.१०.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३)अन्वये जे व्दितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि.१५.१.२००७ च्या अर्जान्वये दि.९.२०.२००६ तेअर्जाच्या दिनांकापर्यत सुरक्षा रक्षक पुरविण्यासंबंधीच्या निविदांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

१. दि.९.२०.३००६ रोजी कोण कोणत्या ठेकेदारानी निविदा भरल्या त्यांची नांवे.
२. निविदा भरलेल्या ठेकेदारापैकी कोणत्या ठेकेदाराची निविदा मान्य केली. त्याबाबतची मान्यतेचे पत्र व त्याची निविदा
३. निविदा मंजूर करताना कोणत्या प्रकारे ऑडीट करुन कोणत्या नियमानुसार मंजूर केले.

जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम-२ नुसार दि.१४.२.२००७ च्या पत्रान्वये माहिती नाकारली आहे. त्याने व्यथित होऊन दि.२२.३.२००७ रोजी प्रथम अपिल केले. परंतू सदर अपिल प्रथम अपिलीय अधिकारी यांना मिळाले नसल्याचे दि.११.७.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीच्या चौकशीनुसार त्यांना कळविण्यांत आले अपिलार्थ्रीना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.२५१०.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले.

आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला (माहिती प्रश्नार्थ स्वरुपाची असल्याने) माहिती न देण्यासंबंधात दि.१४.२.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीना कळविल्याचे नमूद केले आहे.तर प्रथम अपिल दाखल न झाल्याचे प्रथम अपिलीय अधिकारीयांनी नमूद केलेआहे. तर अपिलार्थीना माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी

**यांच्यावर कारवाई करण्याचे व अपिलार्थीस मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळण्याचे नमूद केले आहे.**

**अर्जदाराने मागितलेली सर्व माहिती अधिनियमाच्या तरतूदीनुसार सदर माहिती देता येण्यासारखी आहे. तेव्हा ते आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थीना मागणी केलेली माहिती उपलब्ध करावी. तेव्हा खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**अपिलार्थीना मागणी केलेली माहिती अधिनियमाच्या तरतूदीनुसार अपिलार्थीना १५ दिवसांत द्यावी.**

**अपिल निकालात काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक ३१ मार्च २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४१२३/०२**

**श्री. नविनचंद्र कृपाशंकर उपाध्याय** **अपिलार्थी**
**सी. ४० लक्ष्मीकृपा इमारत, साईबाबा को.ऑ.सो.हौ.**
**दप्तरी सर्व्हीस रोड, नॅशनल हासवे,मालाड (पूर्व)**
**मुंबई ९७**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी**
**(अति/निष्कासन)पश्चिम उपनगरे, यांचे कार्यालय** **उत्तरवादी**
**७ वा मजला, प्रशासकिय इमारत, वांद्रे (पूर्व)मंबई ५१**

**जन माहिती अधिकारी निवासी उपजिल्हाधिकारी**
**(अति/निष्कासन)पश्चिम उपनगरे, यांचे कार्यालय**
**७ वा मजला, प्रशासकिय इमारत, वांद्रे (पूर्व)मंबई ५१**

**-विवेचन-**

**श्री. नविनचंद्र कृपाशंकर उपाध्याय यांनी दि.१२.२.२००९ रोजी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपिल केले त्या अपिलाची सुनावणी दि.३१.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदारास झोपडपट्टीप्राधिकरण अंतर्गत पात्रता निश्चित करण्यासाठी त्यांच्या खोलीच्या सर्वेक्षण/पंचनामा करुन माहिती देण्याबाबत व एस.आर.ए. कार्यालयाकडून माहिती पाठविण्याबाबतची कार्यवाही पाहिजे आहे. अर्जदाराचा अर्ज माहितीचा नसून झोपडपट्टीचा फोटोपास मिळण्यासाठीच्या पात्रता ठरविण्यासबंधीचा आहे. त्यामुळे अर्जदाराने अपील अर्जासोबत झोपडपट्टी फोटोपास मिळण्यासाठी केलेला अर्ज उपजिल्हाधिकारी,मालाड यांचेकडे पाठविण्यांत आला, असे त्यांना कळविण्यांत आले. यावर केलेल्या प्रथम अपिलीय आदेशात अप्पर जिल्हाधिकारी यांनी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.**

**" अर्जात अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार शासन निर्णय दि.११.७.२००१ लागे होतो किंवा कसे ? हे तपासून अर्जदार यांची पात्रता निश्चित करुन आपला सविस्तर अहवाल झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे तात्काळ सादर करावा व सदरची माहिती अर्जदार यांना द्यावी**

**तसेच अर्जदार यांनी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या पात्रतेबाबतचा निर्णय अमान्य अपिल दाखल करणे अनुज्ञेय आहे. "**

**वरील आदेश देताना अप्पर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या माहितीचा अधिकार अधिनियम यातील अपिलीय अधिका-याचा अधिकार तसेच त्यांच्या प्रशासकिय अधिकार असे एकत्र करुन हे आदेश दिलेले आहेत असे दिसते. त्यांच्या आदेशाप्रमाणे उपजिल्हाधिकारी (अति/निष्का),मालाड यांनी प्रशासकिय दृष्टया त्यांची कार्यवाही पूर्ण करावी व माहिती अर्जदारास द्यावी. अर्जदार यांनी उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांना दिलेला पात्रतेबाबतचा निर्णय मान्य नसेल तर अपिल करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे अर्जदाराने अपिल दाखल केलेले आहे व निर्णयाची प्रतिक्षा आहे असेच अपिलार्थी यांनी सुनावणी वेळी सांगितले. तसेच अपीलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे जे आदेश दिले आहेत त्याची अंमलबजावणी करावी.**

**-आदेश-**

**अपिल निकालात काढण्यांत येत आहे.**
**वरील आदेशाची प्रत उपजिल्हाधिकारी,(अतिक्रमण)मालाड यांनाही देण्यांत यावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३१ मार्च २००९**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४११८/०२

श्री.मंगेश जयवंत चव्हाण — अपिलार्थी
चारकोप कांदिवली एकता नगर को.ऑ.हो.सो.लि.
रुमं.न.२९४/४५, एस.न.१५७,
मारवे चारकोप लिंक रोड, कांदिवली (प)
मुंबई ६७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी यांचे कार्यालय
म्हाडा, गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व) — उत्तरवादी
मंबई ५१

जन माहिती अधिकारी सहाय्यक भूव्यवस्थापक,बोरीवली
मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन
वांद्रे (पूर्व)मंबई ५१

-विवेचन-

श्री.मंगेश जयवंत चव्हाण यांनी दि.५.१२.२००९ रोजी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपिल केले त्या अपिलाची सुनावणी दि.३१.३.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास हवी असणारी माहिती १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले होते व अर्जदार प्रथम अपिलीय आदेशानुसार दि.२६.११.२००८ रोजी नस्तीच्या पाहणीसाठी गेले असता त्यांना नस्ती अवलोकनासाठी मिळालेली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत येत आहेत की, दि.१५.४.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता अर्जदाराला सदरील नस्ती दाखवावी व त्यांना हव्या असणा-या कागदपत्राच्या प्रती देण्यांत याव्यात.

तसेच सदरील माहितीची नस्ती अपिलार्थीस का दाखविण्यांत आलेली नाही याबाबत जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती कां लादण्यांत येऊ नये,याबाबतचा खुलासा दि.२०.४.२००९ रोजी पर्यत आयोगास सादर करावा.

-आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे. उपनिर्दिष्ट कार्यवाही करण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३१ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३३५/०२

श्री.पाटील काळू रामदास --अपिलार्थी
रा. दगडी गन्हाण, जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा ---उत्तरवादी
उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
पारोळा, जि.जळगांव

जन माहिती अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी
सार्वजनिक बांधकाम विभाग,अमळनेर जि.जळगांव

-विवेचन-

श्री.काळू रामदास पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. ६.११.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपील केले असून सदर अपिलाची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी गैरहजर होते. तर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि.२.८.२००७ च्या अर्जान्वये सन २००६-२००७ मध्ये अभियंता व कनिष्ठ अभियंते मुख्यालयात राहतात की, बाहेर गावाहून अपडाऊन करतात तसेच त्यांच्या घराचे व मालकांचे नांव/नंबर इ. माहिती मागविली होती. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२४.८.२००७ च्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थीना पाठविली, असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी चुकीची (खोटी)माहिती दिल्याचे नमूद करुन दि.७.९.२००७ रोजी प्रथम अपिल केले. परंतू अपिलार्थी सुनावणीच्या दिवशी दि.२०.१०.२००७ रोजी अनुपस्थित राहिल्याचे नमूद करुन सदर अपिल निकाली काढून दप्तरी दाखल केल्याचे दि.२३.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीना कळविले.

जन माहिती अधिकारी यांनी चुकीची खोटी माहिती दिली. तसेच अपिलार्थी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी हजर असताना गैरहजर दाखविले तर विभागातील संबंधित अधिकारी गैरहजर असताना हजर दाखवून अपिल निकालात काढले असल्याचे नमूद करुन व्दितीय अपील केले आहे.

व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यांनी माहिती मुदतीत दिल्याचे नमूद केले व त्याचे पुरावे दिले.

**सदर प्रकरणातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली. परंतू अपिलार्थी प्रथम तसेच व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला गैरहजर राहिल्याने त्यांची बाजू समजून घेता आली नाही. रेकॉर्डप्रमाणे अधिका-याचे पत्ते देण्यांत आले आहेत. मुख्यालयी जे रहात नाही अशी अर्जदाराची तक्रार असेल तर विभाग प्रमुखाकडे ती करण्यांत यावी. प्राप्त परिस्थितीत खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक ३१ मार्च २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/ ३७६/०२

श्री.संतोष महादु बागले --अपिलार्थी
२१ उदय नगर, विद्यावर्धिनी कॉलेज जवळ,
साक्री, व्ही.डब्ल्यू,एस, कॉलेज जवळ,
जि.धुळे

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी ---उत्तरवादी
**तहसिलदार, साक्री तहसिल कार्यालय,**
**ता.साक्री. जि.धुळे**

**-विवेचन**

**श्री.संतोष महादू बागले यांनी आयोगाकडे दि.१७.८.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपिल केले. त्या अपिलाची सुनावणी दि.३.२.२००७ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.**

**अपिलार्थी यांनी दि.१७.४.२००७ च्या अर्जान्वये श्री. एस.आर.पाटील, मंडळ अधिकारी यांची तलाठी म्हणून नियुक्तीची तारीख, त्यांची मिळकत, त्यांचे वेतन इ. १२ मुद्यांवर माहिती मागविली होती. सदर माहिती दि.१४.५.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना पाठविली. सदर माहिती चुकीची असल्याचे नमूद करुन दि.४.६.२००७ रोजी प्रथम अपिल केले. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती बरोबर असल्याचे अपिलार्थीना कळविले असे असले तरी चुकीची व अपूर्ण माहिती पाठविल्याचे नमूद करुन दि.१७.८.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.**

**व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला अपिलार्थीनी माहिती मिळाल्याने आयोगाकडील अपिल मागे घेत असल्याचे लेखी नमूद केल्याने सदर प्रकरणात खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३१ मार्च २००९**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३५९९/०२

श्री.रवि अनंतराव लांभाडे --अपिलार्थी
मु.पो.शेलुबाजार
ता.मंग्रुळपीर, जिल्हा वाशिम

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विशेष पोलिस ---उत्तरवादी
महानिरिक्षक(आस्थापना),पोलिस महासंचालकार्चे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग,कुलाब, मुंबई ४०० ०१

जन माहिती अधिकारी तथा उपसहायक पोलिस
महानिरिक्षक(गोपनीय) पोलिस महासंचालकार्चे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग,कुलाब, मुंबई ४०० ०१

-विवेचन-

श्री. रवि अनंतराव लांभाडे, अपिलार्थी यांनी वाशीम जिल्हयातील मंगळूरपीर, पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.ज्ञानेश्वर कडू यांच्या दि.१.१.१९८१ ते दि.३१.७.२००८ पर्यतच्या कालावधीतील स्वयंमूल्यनिर्धारण अहवाल व गोपनीय अहवालाच्या सत्यप्रती मिळणेबाबत पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिका-याकडे दि.११.८.२००८ रोजी माहितीचा अर्ज केला होता. उपसहायक, पोलिस महानिरिक्षक (गोपनीय)तथा जन माहिती अधिकारी यांनी सदरहूं माहिती ही गोपनीय अभिलेखाशी संबंधित आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१)(जे)अन्वये माहिती अनुज्ञेय नसल्याचे त्यांच्या दि.२८.८.२००८ च्या पत्राने अपिलार्थीस कळविले. त्या विरोधात अपिलार्थी यांनी दि.२२.९.२००८ रोजी कलम १९(१)अन्वये प्रथम अपील केले. तथापि प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलिस महानिरिक्षक (आस्थापना) यांनी देखील जन माहिती अधिकारी यांच्याप्रमाणेच माहिती अनुज्ञेय नसल्याचे अपिलार्थीस त्यांच्या दि.१४.१०.२००८ च्या आदेशान्वये कळविले.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या निर्णयाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक निरंकचे व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे केले होते ते दि.३१.१०.२००८ रोजी प्राप्त झाले. त्यावर दि.३०.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी तसेच श्री.ह.अ.तोडणकर, जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित होते. तथापि त्यांनी त्यांचा अहवाल पाठविला.

दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेतले व उपलब्ध कागदपत्रे तपासण्यांत आली.

केंद्रिय माहिती आयोगाने तसेच या आयोगाने सुध्दा गोपनीय अहवाल अमान्य केलेली आहेत. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३१ मार्च २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३९३५/०२

श्री. ईश्वरराव आबासाहेब देशमुख --अपिलार्थी
बाई-बाई शिलकर
निवास, रु.नं.२, कुंभार आळी स्टेशन रोड,
कहवा ४०० ६०५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा चिटणीस ---उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे,

जन माहिती अधिकारी तथा आस्थापन अव्वल कारकून
जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे,

-विवेचन-

अपिलकार श्री. ईश्वरराव आबासाहेब देशमुख यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.६.२.२००८ रोजी अर्ज करुन कर्मचा-यांच्या बदल्याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.७.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी असे दि.१.९.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.६.३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.६.२.२००८ रोजी अर्ज करुन कर्मचा-यांच्या बदल्याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. अपीलकारास पुरविण्यांत आलेली माहिती अपु-या स्वरुपाची आहे. मुद्दा क्र. ३ मध्ये माहिती सन २००७ ऐवजी २००६ ची दिली आहे. अर्जातील मुद्दा क्र.१

वगळता मुद्दा क्र.२ ते ७ बाबत माहिती पुरविण्यांत आली नाही.  अशा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही पक्षांशी विचार विनिमय करुन २००७ सालच्या बदल्याच्या नस्त्या अर्जदारास तपासणीसाठी दाखविण्यांत याव्यात व त्यांना ज्या कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील त्या त्यांना देण्यांत याव्यात असे निर्देश देण्यांत आलेत. वरील आदेशाची अंमलबजावणी आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत करण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे.   उपनिर्दिष्ट कार्यवाही करण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ३१ मार्च २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३०९/०२

श्री.मर्दानखॉ  हैदरखॉ --अपिलार्थी
इस्लामपुरा, सुर्यवंशी बिल्डिंग समोर
मु.पो.ता.अमळनेर जि.जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता . उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विज वितरण क.लि.
धरणगांव जि.जळगांव

जन माहिती अधिकारी मुख्य सहाय्यक अभियंता
महाराष्ट्र राज्य विज वितरण क.लि.
धरणगांव जि.जळगांव

-विवेचन-

श्री. मर्दानखॉ हैदरखॉ यांनी आयोगाकडे दि.२८.६.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.२.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि.१०.४.२००७ च्या अर्जान्वये असे नमूद केले आहे की, दि.६.५.२००५ रोजी वाढीव भार १.०० के.वॅट मंजूरीसाठी कनिष्ठ अभियंता एम.एस्. ई.बी. अर्बन-२ अमळनेर यांचेकडे अर्ज दिल्यानंतर त्यांच्या दि.२.४.२००७ च्या पत्रान्वये अनधिकृत ठरविण्यांत आल्याने ज्या नियमान्वये अनधिकृत ठरविले त्या नियमांची माहिती व अर्ज नोंदविलेल्या बारनिशीची नक्क्ल इ.माहिती मागविली होती. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.३.५.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीना उत्तर दिले. परंतू अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.१२.५.२००७ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१.६.२००७ च्या पत्राने अपिलार्थीना उत्तर दिले. परंतू सुनावणी न घेता चुकीचे उत्तर दिल्याचे नमूद करुन अपिलार्थीनी दि.२८.६.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सोबत अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे बाजू मांडली. वाढीव विज पुरवठयाबाबत अपिलार्थीनी नमूद केलेल्या अनधिकृत विज पुरवठा भरणा केल्या तारखेपासून म्हणजे चाचणी अहवाल पासून (दि.६.५.२००५)अधिकृत करण्याबाबतचे पत्र संबंधितांना देण्याचे

**उपस्थित अधिका-यानी मान्य केले व त्यास अपिलार्थीनी सहमती दर्शविल्याने अपिल निकालात काढण्याची विनंती केली आहे. त्यास अपिलार्थीची सहमती आहे. अपिलार्थीना योग्यते पत्र देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केल्याने सदर पत्र हे आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांत निर्गमित करावे असे निर्देश देण्यांत येत आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक ३१ मार्च २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ २९६/०२

श्री.ॲड उमेश छगतन बडगुजर — अपिलार्थी
बडगुजर गल्ली, यावल
ता.यावल, जि.जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी — उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी,भाग भुसावळ, भुसावळ-जि.जळगांव

-विवेचन-

श्री.ॲड उमेश छगन बडगुजर यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि.३०.८.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे व्दितीय अपिल केलेल्या अपिलाची सुनावणी दि.२.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि.२.६.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री.गणेश युवराज तायडे यांच्या जन्मनोंदी संचिकेतील कागदपत्रे पोलिस स्टेशन, यावल यांना कोणी दिल्या तसेच त्याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या कागदपत्रे दिली असल्यास त्यांच्या प्रमाणित नकलांची मागणी केली होती. परंतू सदर माहिती अधिनियमाच्या संज्ञेत बसत नाही असे दि.१४.६.२००७ च्या पत्राने अपिलार्थीना कळवून प्रकरण निकालात काढले त्यापत्राने व्यथित होऊन अपिलार्थीनी दि.५.७.२००७ रोजी प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलाच्या सुनावणीनंतर दि.३.८.२००७ च्या आदेशानुसार अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे दि.१४.८.२००७ च्या सुमारास अपिलार्थीना माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीनी नमूद केले आहे.

अपिलार्थीना विहित मुदतीत माहिती दिली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी दि.३०.८.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे.

व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निण्र्यानंतर माहिती दिली असल्याचे नमूद करुन शास्ती न लादण्याची जन माहिती अधिकारी यांनी विनंती केली आहे.

अपिलार्थी यांनी माहिती मिळण्यास ४२ दिवसांचा विलंब झाल्याचे नमूद करुन रु.१०,५००/- एवढे दंड करण्याचे स्वतंत्र पत्रान्वये सुनावणीच्यावेळी नमूद केले आहे.

तहसिलदार यांचे दि.१४.८.२००७ रोजीचे पत्र पाहता माहिती हेतुपुरस्सर उपलब्ध करुन न देण्याचा उद्देश दिसत नाही. अपिलीय अधिका-याच्या दि.३.८.२००७ च्या

**आदेशावर दि.१४.८.२००७ रोजी अर्जदारास खुलासा केलेला आहे. म्हणून पुढील आदेश देण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३१ मार्च २००९**